अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड
www.surajyadigital.com मंगळवार दि.२५ ऑक्टोबर २०२२ वर्ष : २१ वे अंक : २८ वा किंमत : ५ रुपये पाने ८

# ना बँक, ना दहा वर्षात कर्जासाठी कुणाचा अर्ज, तरीही सरकारने माफ केले हजार कोटींचे कर्ज

## लबाडाघरचे आवताण जेवल्याशिवाय खरे नाही : शरद पवार

सुराज्य/पुणे

**एकेकाळी शेतकऱ्यांसाठी वरदान असणारी बँक भूविकास बँक. सन १९९८ पासून या बँकेचे कर्जवितरण झाले बंद. सन २०१३ सालीच ही बँक गेली अवसायनात. आज घडीला बँकही अस्तित्वात नाही आणि बँकेचे कामकाजही चालू नाही. ना बँक, ना गेल्या दहा वर्षात या बँकेकडे कर्जासाठी कुणाचा अर्ज. तरीही 'ई-डी'सरकार(एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस) ने माफ केले या बँकेचे तब्बल हजार कोटींचे कर्ज. यावरच राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. एवढेच नव्हे तर ' हा लबाडांचा खेळ आहे, लबाडाघरचे आवताण जेवल्याशिवाय खरे नाही', अशा शब्दात सरकारच्या नावाने ऐन दिवाळीत टीकेचे फटाके फोडले आहेत.**



पुणे जिल्ह्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना पवारांनी भू विकास बँकेच्या कर्जमाफीबाबत शिंदे सरकारकडून केला जाणारा दावा पूर्णपणे फसवा असल्याचा आरोप केला. राज्यातील भू विकास बँकेच्या सुमारे ३५ हजार शेतकऱ्यांचे ९६४ कोटींचे थकित कर्ज माफ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. दिवाळीच्या तोंडावर राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतल्याचा प्रचारही भाजपने केला होता. यावरून पवार यांनी शिंदे सरकार आणि भाजपवर ही शेरेबाजी केली.

### एकाही शेतकऱ्याला नाही मिळाले कर्ज

राज्य सरकारचा दावा खोटा आहे. भू विकास बँकेतील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले, असे राज्य सरकार सांगत आहे. मात्र गेल्या १० वर्षांमध्ये किमान एका शेतकऱ्याला तरी भू विकास बँकेचे कर्ज मिळाले आहे का? भू विकास बँक अस्तित्वात आहे, ही गोष्ट तरी तुम्हाला माहिती आहे का? भू विकास बँक एकेकाळी होती. मात्र, आता ती राज्यात कार्यरत नाही. तरीही कर्जमाफी कशी? असा प्रश्न पवारांनी उपस्थित केला.

### वसुली होणार नाही म्हणून...

आता भू विकास बँकेचे नावही कोणाला माहीत नाही. ती २०१३ मध्ये अवसायनात गेली आहे. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून या बँकेने दिलेल्या कर्जांची वसुली झालेली नाही. ही वसुली होणार नाही, हे कळल्यानंतर राज्य सरकारने घोषणा केली की आम्ही भू विकास बँकेतील शेतकऱ्यांची कर्जे माफ करत आहोत, असे सांगितले. लबाडाच्या घरचे आवताण जरी असले तरी जेवल्याशिवाय खरे नसते, असा टोला पवार यांनी लावला.

### सन २०१३ मध्ये बँक अवसायनात

शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचे शेतीकर्ज देण्यासाठी भूविकास बँकेची स्थापना करण्यात आली होती. या बँकेची राज्य स्तरावर शिखर बँक होती. प्रत्येक जिल्ह्यात बँकेच्या ३० उपशाखा होत्या. या बँकेचे १९९८ पासून कर्ज वितरण बंद झाले. २००२ मध्ये ही बँक अवसायनात काढण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यानंतर २००८ मध्ये वैद्यनाथन समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने लाभ मिळवून या बँकांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. अखेर २०१३ मध्ये अवसायनात काढण्याचा निर्णय सरकारने घेतला.

## भारतीय वंशाचे ऋषी सुनक ब्रिटनचे नवे पंतप्रधान!

सुराज्य/नवी दिल्ली

भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांची ब्रिटनच्या पंतप्रधानपदी निवड झाली आहे. ते ब्रिटनचे पहिले भारतीय वंशाचे पंतप्रधान बनले आहेत. हुजूर पक्षाचे नेते ऋषी सुनक यांचे नाव जाहीर झाल्याने तमाम भारतीयांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाला आहे. तथापि, ब्रिटनची घसरलेली अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आणण्याचे आव्हान सुनक यांच्यासमोर असेल.



जुलै महिन्यात ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यासह ४० जणांनी राजीनामे दिल्याने ते सरकार कोसळले होते. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत ऋषी सुनक यांचा पराभव करून लिझ ट्रस विजयी झाल्या होत्या. पण अवघ्या ४५ दिवसांतच त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. त्यांनी ६ सप्टेंबर २०२२ रोजी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली आणि ४५ दिवसांत राजीनामा दिल्यामुळे ब्रिटनच्या इतिहासातील त्या सर्वात कमी कार्यकाळ असलेल्या पंतप्रधान बनल्या. पंतप्रधानपदाच्या प्रचारादरम्यान अर्थव्यवस्था रुळावर आणण्याबाबत लिझ ट्रस यांनी आश्वासने दिली होती. नेमकी तीच त्यांच्या अडचणीची ठरली. महागाई नियंत्रणात आणण्यात ट्रस सरकार पूर्णपणे अपयशी ठरले. ट्रस यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करणारे अर्थमंत्री क्वासी क्वार्टेंग यांना राजीनामा द्यावा लागला होता. तर, लिझ ट्रस यांना करकपातीसंदर्भातील आपली सर्व धोरणे मागे घ्यावी लागली होती. या धोरणांचा फटका अर्थव्यवस्थेला बसला होता. राजकीय संकटही अधिक गहिरे झाले होते. ट्रस यांच्या राजीनाम्यानंतर पुन्हा एकदा निवडणूक घेण्यात आली.

माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी काल पंतप्रधानपदाच्या रेसमधून माघार घेतली होती. तेव्हाच ब्रिटनचे अर्थमंत्री राहिलेल्या ऋषी सुनक यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. त्यांच्यासमोर पेनी मॉर्डंट यांचे आव्हान होते. पण पेनी मॉर्डंट यांनीही माघार घेतल्याने सुनक नवे पंतप्रधान झाले आहेत.

### अर्थव्यवस्थेचे आव्हान :

ब्रिटनची अर्थव्यवस्था सध्या घसरली आहे. त्यामुळे महागाईच्या झळा तिथे वाढत आहेत. त्याचाच परिणाम म्हणून तेथील राजकीय परिस्थिती देखील अस्थिर झाली आहे. गेल्या चार महिन्यांतच दोन पंतप्रधानांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे आर्थिक घडी पुन्हा बसवून ब्रिटनला प्रगतीपथावर आणण्याचे महत्त्वाचे कार्य सुनक यांना करायचे आहे.

## वडिलांच्या डोक्यात मुलाने फरशी घालून केला खून

### एमआयडीसी परिसरातील किर्ती नगरातील घटना

सुराज्य/सोलापूर

दारू पिऊन घरात आईला त्रास तसेच भांडण करीत असल्याच्या कारणावरून ४५ वर्षीय वडिलांच्या डोक्यात फरशी टाकून खून करण्यात आला. ही घटना अक्कलकोट रोडवरील रमण नगरात आज सोमवारी सकाळी उघडकीस आली.

बसवराज लक्ष्मण गवंडी (वय ४५ रा. रमणनगर, मल्लिकार्जुन नगर जवळ, अक्कलकोट रोड सोलापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. बसवराज गवंडी हे मिस्त्रीचे काम करत होते. त्यांना दारूचे व्यसन होते. ते दररोज आईबरोबर तसेच घरात भांडण करीत होते. काल रात्री मयत आणि त्यांचा मुलगा आकाश यांच्यात भांडण झाले होते. आज सकाळी बसवराज यांचा मृतदेह अंथरुणात आढळला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर एमआयडीसीच्या पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्यांचा खून आकाश गवंडी(मुलगा) याने केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे पोलिसांनी रात्री आरोपीला अटक केली. मयत बसवराज यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक माने करीत आहेत.



### अन् पायाखालील जमीनच सरकली

आकाशचा लहान भाऊ हा बारावीमध्ये शिकतो.सतत होणाऱ्या वडिलांच्या त्रासाला कंटाळून तो बालपणापासून मामाकडे राहायला होता. दिवाळीनिमित्त आकाशची आई देखील माहेरी गेली होती. दिवाळीसाठी लागणारे पदार्थ घेऊन आकाशची आई व भाऊ सोमवारी सोलापुरात आले होते.पण त्या दिवशी हा प्रकार त्यांना दिसला आणि त्यांच्या पायाखालील जमीनच सरकली.

## रूद्देवाडी येथे चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा कोयत्याने खून; पतीविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

चारित्र्याच्या संशयावरून २५ वर्षीय विवाहितेचा कोयत्याने खून केल्याची घटना रुद्देवाडी (ता.अक्कलकोट) येथे रविवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

शितल गणेश उपाडे (वय २५ रा.रेवली ता.परळी जि.बीड) असे खून झालेल्या विवाहितेचे नाव आहे. या प्रकरणात तिचा पती गणेश तुळशीराम उपाडे (वय २८) याच्याविरुद्ध अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. काल रविवारी सकाळच्या सुमारास रूद्देवाडी येथील मारुती पुजारी यांच्या शेताच्या बांधाजवळ शीतल उपाडे हिचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. चारित्र्याच्या संशयावरून तिचा पती गणेश उपाडे याने कोयत्याने खून केला. अशा आशयाची फिर्याद पोलीस नाईक नबीलाल मियावाले यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रदीप काळे करीत आहेत

## आजारास कंटाळून घटस्फोटीत तरुणीची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

पोटदुखीच्या आजारास कंटाळून एका २५ वर्षीय घटस्फोटित महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना अशोक चौक परिसरातील बोल्ली मंगल कार्यालयाजवळ सोमवारी सकाळच्या सुमारास घडली.

दिपाली शाम अलकुंटे (वय २५) असे मयत तरुणीचे नाव आहे. तिने आज सकाळी ६ वाजण्याच्यापूर्वी घरातील छताच्या लाकडी वाशाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतली होती.

तिच्या पश्चात आई आणि दोन भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

## भारत-पाक पुन्हा!

**मेलबर्न** : शोएब अख्तरने दावा केला आहे की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात टी-२० विश्वचषकात सेमीफायनलमध्ये पुन्हा एकदा सामना होणार आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपलं कामच आव्हानात्मक आहे

# आनंदाच्या शिधाने निराशाच केली

## अर्धवट साहित्य मिळाल्याने शिधापत्रिकाधारकांमध्ये संताप

सुराज्य/सोलापूर

**सर्वसामान्य शिधापत्रिकाधारकांना केवळ १०० रुपयात आनंदाचा शिधा संच देऊन दिवाळी गोड करण्यासंदर्भातील शिंदे - फडणवीस सरकारच्या योजनेच्या नियोजनाचा सोलापूर शहरात व जिल्ह्यात पुरता बोजवारा उडाला आहे. बहुतांश रेशन दुकानात संपूर्ण शिधा साहित्य आले नाही. त्यामुळे प्रतीक्षा करूनही ऐन दिवाळीतच अर्धवट शिधा संच वाटप सुरू असल्याने सर्वसामान्य नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. सर्वसामान्यांची ही क्रूर चेष्टा होत असल्याचे ठिकठिकाणी बोलले जात आहे.**

सर्वसामान्य नागरिकांची दिवाळी अत्यल्प खर्चात गोड व्हावी म्हणून शिधापत्रिकाधारकांना केवळ १०० रुपयांत साखर, रवा, चणाडाळ आणि एक लीटर पामतेलाचा आनंदाचा शिधा संच देण्याची घोषणा शिंदे-फडणवीस सरकारने केली. यामुळे सर्वत्र सामान्य जनतेत आनंदाचे वातावरण पसरले होते. यंदाची दिवाळी कमी खर्चात गोड होईल या प्रतीक्षेत शिधापत्रिकाधारक होते. या ना त्या कारणाने आज उद्या शिधा येईल, असे सांगण्यात आले. दिवाळी तोंडावर आली तरीही प्रतीक्षाच करावी लागली.

दरम्यान, काही ठिकाणी गाजावाजा करत आनंदाचा शिधा संच वाटपाचा फोटोसेशन कार्यक्रमही पार पडला. तो अपवाद वगळता इतर ठिकाणी हा परिपूर्ण संच उपलब्ध झाला नसल्याने ओरड होत आहे. आता ऐन दिवाळीत रेशन दुकानांमध्ये शिधावाटप सुरू झाले. मात्र घोषणा केल्याप्रमाणे संपूर्ण शिधा संच अनेक रेशन दुकानात उपलब्ध झाला नाही. अर्धवट साहित्य प्राप्त झाल्याने उपलब्ध असलेलेच साहित्य रेशन दुकानदारांना




शिधापत्रिकाधारकांना द्यावे लागले. यामुळे आनंदाऐवजी निराशाच पदरी पडली. यामुळे त्या नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. उत्तर तालुक्यात दुकानदार लाभार्थ्यांना ह्या ना त्या कारणासह परत पाठवीत आहेत, याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी व्हावी अशी मागणी जोर धरत आहे. ऐन दिवाळीतही सर्वत्र साहित्य पोहचलेले नाही. जेथे पोहचले तेथे वाटप सुरू झाले. मात्र अनेक रास्त भाव दुकानात अर्धवट शिधा संच वाटप सुरू असल्याने शिधापत्रिकाधारकांमध्ये संताप व्यक्त होत आहे .काही दुकानात सर्व साहित्य आले पण ऑनलाईन प्रक्रिया संथ असल्याने अडचणी येत आहेत.

त्यामुळे ऑफलाईन सह्या घेऊन उपलब्ध शिधा दिला जावा अशी मागणी होत आहे. दरम्यान, जिल्ह्यात सर्व दुकानात साहित्य पोहचल्याचा तर शहरात काही दुकानांमध्ये वाटप होत असल्याचा दावा फोल ठरला. आनंदाचा शिधा संच' १९ आणि २० ऑक्टोबरपर्यंत जिल्हापातळीवर सर्व रेशन दुकानांवर पोहचवण्यात येईल आणि त्यानंतर या वस्तूंचे वाटप करण्यात येईल, असे पुरवठा मंत्र्यांनी जाहीर केले होते.

मात्र नियोजनाचा पुरता बोजवारा उडाल्याने हा स्तुत्य उपक्रम अपेक्षित ठरला असल्याचा आरोप होत आहे.तेव्हा शिधा संचापासून कोणीही लाभार्थी वंचित राहू नये याची पुरवठा खात्याने लक्ष घालावे अशी मागणी जोर धरीत आहे.